**सभासद - ३९७६**

अहवाल सालांत नवीन सभासद २५ झाले असून, ७५ सभासद कमी झाले आहेत. आणि **३१ मार्च २००९** रोजी एकूण सभासद ३९७६ इतके आहेत.

**भागभांडवल -**

अहवाल सालांमध्ये रु. **३,२३,८००/००** ने भाग भांडवल कमी झाले आहे. संस्थेचे भाग भांडवल वाढीकरिता सभासद बंधू भगिनींना शेअरवाढीबाबत पत्र पाठवून, अहवालामध्ये आवाहन करून विनंती केली आहे. तरी कृपया ज्या सभासद बंधू - भगिनींनी आपले भांडवल रु. १५०० केले नसेल त्यांनी सत्वर पूर्ण करावे.

**राखीव व इतर निधी - ६,५३,८२,१८२/१०**

अहवाल सालामध्ये एकूण निधीमध्ये रु. **१९,४७,१११/२५** ने वाढ झाली आहे. **३१ मार्च २००९** रोजी संस्थेचे एकूण निधी रु. **६,५३,८२,१८२/१०** इतके आहेत.

**ठेवी -**

संस्थेकडील ठेवी या सामान्य ग्राहकांच्या विश्वासाचा ठेवा आहे. तो जपतांना संस्थेला विशेष गुणवत्ता जपावी लागते आहे. आणि आपल्या पाठींब्यावर आम्ही ती जपली आहे. म्हणूनच गतसालांत ठेवीमध्ये रु.**२,२३,८१,४६४/५२** ने वाढ होऊन **५१ कोटीचा** टप्पा पार केला आहे. याबद्दल सभासद, **कै. वसंत आण्णा** चौगुले कुटूंबीय, संचालक मंडळ व सेवक यांनाही धन्यवाद देत आहे.

**कर्जे - ३४,७२,३६,९३१/७६**

संस्थेकडे येणाऱ्या ठेवीपैकी कर्जवाटपाचा रेषो सांभाळून कर्जवाटप केले आहे. वाटप करतांना नियमाप्रमाणे योग्य ती सुरक्षितता पाहिली आहे. योग्य, सुरक्षित चांगला कर्जदार मिळणे दुरापास्त झाले आहे. तरी **३१ मार्च २००८** अखेर एकूण कर्जे रु. **३४,७२,३६,९३१/७६** आहेत.

**कर्जदार विमा -**

स्टेट बँक ऑफ इंडिया लाईफ इन्श्युरन्स कंपनी मार्फत ५ लाखापर्यंतचे खातेदारांचा विमा घेतला आहे. तरी वारसांनी सतर्क राहून योजनेचा लाभ घ्यावा.

**थकबाकी -**

थकबाकी ही संस्थांची डोकेदुखी आहे. त्याकरिता कर्जदार बंधू - भगिनींनी आपले कर्जाचे हप्ते वेळेत भरणे आवश्यक आहे. कर्ज देतांना काळजी घेऊनही आपत्तीमुळे अथवा बिनबुडाच्या अफवामुळेही कर्जदार आळशी बनत आहेत. म्हणून कर्जदार बंधू - भगिनींना विनंती करतो की त्यांनी आपली थकबाकी सत्वर भरून संस्थेस सहकार्य करावे. तरीही आपल्या संस्थेचे थकबाकी प्रमाणसुद्धा कमी झाले आहे. उर्वरीत थकबाकीदारांचेवर कायद्याच्या आधीन राहून कारवाई सुरू आहे. तरीपण संस्थेची भूमीका तडजोडीची आहे.